Teachingninja.in

Latest Govt Job updates

Private Job updates

Free Mock tests available

Visit - teachingninja.in

Teachingninja.in

# MPSC
# Excise Sub Inspector

## Previous Year Paper

### Mains paper-I 24 Sept 2017

Teachingninja.in

दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क गट - क (मु२०२१)
परीक्षा - 2017

2017

दि २४ सप्टेंबर, 2017

D10

A

संच क्र.
Series No.

प्रश्नपुस्तिका क्रमांक 104685
BOOKLET No.

# प्रश्नपुस्तिका
## पेपर I
## मराठी व इंग्रजी

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता** नमूद करावा.

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण एखादा प्रश्न **कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या शेवटच्या पानावर पहा

Teachingninja.in

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

Teachingninja.in

Teachingninja.in

1. 'ओनामा' या शब्दाचा पुढीलपैकी अर्थ कोणता ?

(a) प्रथम
(b) शेवट
(c) प्रारंभ
(d) राजा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर बाकी सर्व चूक
(2) फक्त (b) बरोबर बाकी सर्व चूक
(3) फक्त (c) बरोबर बाकी सर्व चूक
(4) फक्त (d) बरोबर बाकी सर्व चूक

2. पुढील शब्दाच्या जोड्या जुळवा व योग्य पर्याय ओळखा :

(a) अनल — (i) सुधा, पीयुष
(b) अमृत — (ii) जंगल, वन
(c) अरण्य — (iii) हय, वारू
(d) अश्व — (iv) पावक, अग्नी

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (iv) | (i) | (iii) |
| (3) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (4) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

3. पुढील विरुद्धार्थी शब्दाच्या जोड्या जुळवा व त्यांचे पर्याय शोधा :

(a) कृष्ण — (i) उतरण
(b) चढण — (ii) सौम्य
(c) उग्र — (iii) धवल
(d) अव्हेर — (iv) स्वीकार

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iv) | (iii) |
| (2) | (iii) | (i) | (ii) | (iv) |
| (3) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |



Teachingninja.in

4. पुढीलपैकी चुकीची जोडी ओळखा :
(1) खूण – चिन्ह
(2) खग – पक्षी
(3) काळोख – अंधार
(4) कुरूप – कंजूष

5. कर, पुष्प, जल, पृथ्वी हे शब्द संस्कृत भाषेतून मराठीत आले. या शब्दाचा प्रकार कोणता ?
(1) तद्भव (2) तत्सम
(3) देशी (4) परभाषीय

6. खालीलपैकी कोणता वर्ण 'ओष्ठ्य' पद्धतीने उच्चारला जातो ?
(1) र् (2) क् (3) भ् (4) ल्

7. 'सज्जन' या शब्दातील संधीचा प्रकार कोणता ?
(1) स्वरसंधी (2) व्यंजनसंधी
(3) विसर्गसंधी (4) सजातीय स्वरसंधी

8. पुढीलपैकी विध्यर्थ क्रियापद असलेले वाक्य
(1) या वर्षी पाऊस पडावा (2) मुले अभ्यास करतात
(3) एवढे आमचे काम कराचं (4) मी हे काम करू ?

9. पुढीलपैकी कोणत्या वाक्यात संकेतार्थ नाही ?
(1) मला जर बरे असते तर मी भाग घेतला असता
(2) पाऊस आला तरी सहल जाणारच
(3) तू आला नसतास तरी चालले असते
(4) सगळेच शहाणे कसे असतील ?

10. गणेशरावांना हॉटेलच्या व्यवसायात नुकसान सोसावे लागले.
अधोरेखित शब्दसमुहासाठी खालीलपैकी योग्य वाक्प्रचार निवडा.
(1) अद्दल घडणे (2) अंगावर शेकणे (3) अन्नावर वाढणे (4) अन्न अन्न करणे

11. 'कागदी घोडे नाचविणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ शोधा.
(1) लेखनात कमीपणा दाखविणे (2) कागदाचे घोडे करून नाचविणे
(3) लेखणी जोरात चालविणे (4) फक्त लेखनात शूरपणा दाखविणे

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

12. 'तारे तोडणे' या वाक्यप्रचाराचा पुढीलपैकी अर्थ कोणता ?

(1) आकाशातील तारे तोडून आणणे (2) वेड्यासारखे बोलणे
(3) नवल करणे (4) खूप कष्ट करणे

13. खालील शब्दांपैकी विसंगत शब्द ओळखा.

(1) क्षीर (2) सलील (3) अम्भ (4) वारी

14. 'अर्थ नसणे' या अर्थाचा वाक्यप्रचार कोणता ?

(a) गाशा गुंगळणे
(b) फुगडी घालणे
(c) वाऱ्यावर सोडणे
(d) राम नसणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) बरोबर (2) फक्त (b) बरोबर
(3) (b) आणि (c) बरोबर (4) फक्त (d) बरोबर

15. 'जीव टांगणीला लागणे' या वाक्यप्रचाराचा अर्थ शोधा.

(1) जीवावर उदार होणे (2) उतावीळ होणे
(3) खूप कष्ट करणे (4) चिंताग्रस्त होणे

16. जोड्या जुळवा :

(a) मूळची भाववाचक नामे परंतु विशेषनामासारखा उपयोग — (i) शहाण्यांना शब्दांचा मार्ग
(b) विशेषनामाचा अनेकवचनी उपयोग — (ii) आमच्या क्रिकेटपटूंची वाहवा झाली
(c) मूळची विशेषणे पण नामासारखा उपयोग — (iii) विश्वास परीक्षेत उत्तीर्ण झाला
(d) मूळची अव्यये पण नामाचे कार्य — (iv) आमच्या वर्गात तीन पाटील आहेत

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (ii) | (i) | (iv) | (iii) |

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

17. पुढीलपैकी समानार्थी शब्दांचा चुकीचा गट ओळखा :

(a) ऐट, दिमाख, डौल, रुबाब

(b) रान, कानन, वन, विपिन

(c) नग, अभी, शैल, गिरी

(d) सुता, तनया, नंदन, तनुज

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (d) बरोबर
(2) फक्त (a) बरोबर
(3) फक्त (b) बरोबर
(4) फक्त (c) बरोबर

18. पुढीलपैकी संस्कृत प्रत्यय व त्यापासून बनलेली धातुसाधिते नाहीत.

(a) नयन, चरण, वदन, पालन

(b) इच्छा, कथा, गुहा, चिंता

(c) पुजारी, पिंजारी, रंगारी

(d) कढी, मोडी, उडी, बोली

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर
(2) फक्त (b) बरोबर
(3) फक्त (c) व (d) बरोबर
(4) फक्त (a) व (b) बरोबर

19. पुढील वाक्ये उभयान्वयी अव्ययाने जोडली आहेत, त्या आधारे ओळखा.

(a) समुच्चय बोधक — (i) लोक आपली स्तुती करोत किंवा निंदा

(b) विकल्प बोधक — (ii) मरावे परी कीर्तिरूपे उरावे

(c) न्यूनत्व बोधक — (iii) वाटेत मोटार नादुरुस्त झाली म्हणून मला यावयास उशीर झाला

(d) परिणाम बोधक — (iv) विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**20.** पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

(a) वस्तुवाचक कर्मांना प्रत्यक्ष कर्मे म्हणतात.

(b) व्यक्तिवाचक कर्मांना अप्रत्यक्ष कर्मे म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) चूक (2) फक्त (a) बरोबर

(3) (a) व (b) चूक (4) (a) व (b) बरोबर

खालील उतारा वाचा व त्यावरील प्रश्न क्र. **21** ते **25** सोडवा.

१९७५ या वर्षी युनोने स्त्री दशक जाहीर केले. त्यानिमित्ताने संपूर्ण जगात स्त्रियांच्या प्रश्नांचे विचारमंथन झाले. भारतात यानंतर अनेक स्त्री संघटनांची स्थापना झाली. स्त्री प्रश्नांवर तळमळीने कार्य करण्यासाठी अनेक कार्यकर्त्या पुढे आल्या. समविचारी स्त्रियांचे संघटन तयार झाले आणि यातूनच स्त्रीवादी नियतकालिकांची निर्मिती होऊ लागली. या आधीही स्त्रियांसाठी नियतकालिके चालविली गेली पण त्यांचे स्वरूप पुरुषसत्ताक परिप्रेक्ष्यातून स्त्रियांचा विचार करणारे होते त्यामुळे स्त्रीच्या 'आदर्श पत्नी' व 'आदर्श माता' या रूपांवर भर देण्यात आला. माजघराच्या चौकटीत राहून स्त्रियांची करमणूक व्हावी. कुटुंबाला उपयुक्त गोष्टी त्यांनी करत राहाव्यात असे या नियतकालिकांचे स्वरूप होते. स्त्रीवादी नियतकालिके मात्र स्त्रियांचे समग्र माणूसपणाचे भान जागृत करण्यासाठी प्रयत्नशील होते त्यामुळे पारंपरिक नियतकालिकांपेक्षा या नियतकालिकांचे स्वरूप वेगळे होते. त्यामुळे या नियतकालिकांना बऱ्याच काळापर्यंत पुरुषांची हेटाळणी सहन करावी लागली.

१९७५ नंतर स्त्रीवादी चळवळीत जे नवे मूल्यभान निर्माण झाले त्याला खतपाणी घालण्याचे महत्त्वपूर्ण काम स्त्रीवादी नियतकालिकांनी केले. स्त्री प्रश्नांचा समग्र विचार करून स्त्रियांचे प्रश्न बौद्धिक पद्धतीने, आग्रहपूर्वक मांडण्याचा प्रयत्न केला. स्त्रीवादी, स्त्रीवादी चळवळ तसेच स्त्रीवादी साहित्य आणि समीक्षा याविषयी प्रभावी मांडणी या नियतकालिकांमधून झाली. चळवळीत काम करणाऱ्या स्त्रियांची मते जाणून घेण्यासाठी या नियतकालिकांचा उपयोग झाला. मराठीतील स्त्रीवादी नियतकालिकांचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल. बायजा–सौदामिनी राव, प्रेरक ललकारी–शारदा साठे, महिला आंदोलन पत्रिका–मीनाक्षी साने, मिळून साऱ्याजणी–विद्या बाळ, प्रतिबिंब–प्रतिमा कुलकर्णी, आम्ही मैतरणी–मीनाक्षी मून, डॉ. निलम गोऱ्हे–आम्ही स्त्रिया, सुमन बंग–सखी, स्त्री उवाच हे वार्षिक यासारखी स्त्री प्रश्नांना प्राधान्य देणारी नियतकालिके मराठीत निर्माण झाली. या सगळ्या नियतकालिकांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व नियतकालिकांच्या संपादकपदी स्त्रिया आहेत. चळवळीत काम करणाऱ्या अनेक स्त्रियांनी या नियतकालिकांमधून स्त्री प्रश्नांचे विचारमंथन केले आणि स्त्रीवादाचे विविध आयाम ही स्पष्ट केले. स्त्रियांच्या मूलभूत गरजांपासून स्त्रीवादाच्या सैद्धान्तिक मांडणीपर्यंतचे लेखन नियतकालिकांमधून झाले. स्त्रीवादी ललित साहित्याला या नियतकालिकांमुळे मोठेच पाठबळ मिळाले. स्त्रीवादी साहित्याची वेगळी वैशिष्ट्ये विशद करण्यासाठी मदत झाली. एकंदरीत पारंपरिक पुरुषसत्ताक विचारप्रणालीला छेद देऊन स्त्रीवादी मानवतावादाचा अंगीकार करून नवसमाज निर्मितीची स्वप्ने या नियतकालिकांनी बघितली.



Teachingninja.in

21. स्त्रीवादी नियतकालिकांचे स्वरूप वेगळे होण्याचे कारण काय ?
(1) स्त्री 'आदर्श पत्नी' व 'आदर्श माता' व्हावी यावर भर
(2) ते समविचारी स्त्रियांचे संघटन होते
(3) त्यात स्त्रियांच्या समग्र माणूसपणाचे भान जागृत करण्याचा प्रयत्न होता
(4) कुटुंबाला उपयुक्त गोष्टी स्त्रियांनी कराव्यात असे स्वरूप होते

22. स्त्रीवादी नियतकालिकांनी कोणते महत्त्वपूर्ण काम केले ?
(1) नवीन मूल्यभानाला खतपाणी घालणे
(2) स्त्री प्रश्नांचा समग्र विचार करणे
(3) स्त्रीवाद, स्त्रीवादी चळवळ यांची प्रभावी मांडणी करणे
(4) वरील सर्व पर्याय बरोबर आहेत

23. दिलेल्या उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.
(1) स्त्रीवादी साहित्य
(2) स्त्रियांचे बौद्धिक प्रश्न
(3) स्त्रीवादी नियतकालिके
(4) मानवतावादी साहित्य

24. वरील उताऱ्यातून लेखकाची कोणती भूमिका दिसून येते ?
(1) पुरुषसत्ताक विचारसरणीला छेद देणे
(2) स्त्री-दशकासंदर्भात माहिती देणे
(3) स्त्रीवादी नियतकालिकांसंबंधी माहिती देणे
(4) नियतकालिकांसंबंधी माहिती देणे

25. दिलेल्या उताऱ्यातून कोणता निष्कर्ष काढता येतो ?
(1) स्त्रीवादी नियतकालिकांना पुरुषांची हेटाळणी सहन करावी लागली
(2) चळवळीत काम करणाऱ्या स्त्रियांची मते यातून जाणून घेतली गेली
(3) या नियतकालिकांच्या संपादकपदी स्त्रिया आहेत
(4) नवसमाज निर्मितीची स्वप्ने स्त्रीवादी नियतकालिकांनी पाहिली

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**26.** पुढील विधाने वाचा :

(a) दासी, दृष्टी या नामाचे अनेकवचन या-कारान्त होते.

(b) वाळू, वस्तू या नामाचे अनेकवचन वा-कारान्त होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर
(2) (a) व (b) बरोबर
(3) (a) चूक
(4) (a) व (b) दोन्ही चूक

**27.** पुढे काही संख्याविशेषणे दिली आहेत. त्याच्या जोड्या जुळवा :

(a) क्रमवाचक — (i) फार
(b) आवृत्तीवाचक — (ii) प्रत्येक
(c) पृथकत्ववाचक — (iii) पहिला
(d) अनिश्चित — (iv) तिप्पट

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (4) | (i) | (ii) | (iv) | (iii) |

**28.** पुढे दिलेल्या गटात परभाषीय शब्द नसलेला गट ओळखा.

(1) शेट, दलाल
(2) पगार, कोबी
(3) झोप, खुळा
(4) खर्च, मेहनत

**29.** पुढीलपैकी तत्सम शब्द नाहीत.

(1) भाऊ, गाव
(2) जल, ग्रंथ
(3) कर, ग्रंथ
(4) परंतु, यद्यपि

**30.** पुढीलपैकी कोणता शब्द सामासिक आहे ?

(1) सुसंगती
(2) बांधिलकी
(3) राष्ट्रगीत
(4) धडाधड

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**31.** पुढील जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (a) वस्त्र | (i) भरीव वस्तु |
| (b) घन | (ii) कमतरता |
| (c) कसर | (iii) चिखल |
| (d) गारा | (iv) अंबर |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (4) | (iii) | (ii) | (iv) | (i) |

**32.** वामनरावांची आता अन्नान दशा झालीय, पण एकेकाळी या घरात ________

या वाक्यात पुढीलपैकी कोणता वाक्यप्रचार योग्य आहे ?

(1) अटकेवर झेंडा लावणे
(2) अग्नीदिव्य करणे
(3) अत्तराचे दिवे लावणे
(4) घरावर तुळशीपत्र ठेवणे

**33.** नकारार्थी वाक्यांना काय म्हणतात ?

(1) स्वार्थी
(2) करणरूपी
(3) अकरणरूपी
(4) विध्यर्थी

**34.** पुढीलपैकी सर्वनामोत्पन्न सर्वनामे कोणती ?

(a) हा – असा, असला, इतका, एवढा
(b) जो – जसा, जितका, जेवढा
(c) तो – तसा, तसला, तेवढा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर
(2) फक्त (b) चूक
(3) फक्त (c) बरोबर
(4) (a), (b), (c) सर्व बरोबर



Teachingninja.in

**35.** जोड्या जुळवा :

(a) उपपदतत्पुरुष (i) दररोज

(b) सामान्यरूप तत्पुरुष (ii) शेषशायी

(c) संकीर्ण अव्ययीभाव (iii) दरवर्ष

(d) यावनी अव्ययीभाव (iv) दीनानाथ

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (2) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (iv) | (ii) | (i) | (iii) |

**36.** 'पक्षी आकाशात उडाला' या वाक्यातील प्रयोग ओळखा.

(1) भावे प्रयोग
(2) कर्मणी प्रयोग
(3) अकर्मक कर्तरी प्रयोग
(4) सकर्मक कर्तरी प्रयोग

**37.** मुलांनो, चांगला अभ्यास करा. हे वाक्य कोणत्या प्रकाराचे आहे ?

(1) होकारार्थी
(2) नकारार्थी
(3) आज्ञार्थी
(4) वरीलपैकी नाही

**38.** तानाजी लढता लढता मेला. हे वाक्य कोणत्या प्रकाराचे आहे ?

(1) मिश्रवाक्य
(2) संयुक्तवाक्य
(3) केवलवाक्य
(4) यापैकी नाही

**39.** तो आजारी होता म्हणून तो शाळेत गैरहजर राहिला. या वाक्यातील प्रकार ओळखा.

(1) संयुक्तवाक्य
(2) मिश्रवाक्य
(3) केवलवाक्य
(4) शुद्धवाक्य

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**40.** एकमेकाशी संबंध असलेली दोन किंवा अधिक केवलवाक्य दिली असता ती एकत्र करून त्यांचे वाक्य बनविणे यास ___________ म्हणतात.

(1) क्रियापद (2) वाक्यपृथ्यक्करण
(3) वाक्यसंश्लेषण (4) शब्दसमूह

**41.** व्यर्थ, झटकन, खचित, मुद्दाम ही उदाहरणे कोणत्या क्रियाविशेषण अव्ययाची आहेत ?

(1) निषेधार्थक (2) स्थलवाचक (3) गतिदर्शक (4) रीतिवाचक

**42.** पुढील शब्दातील तत्सम शब्द ओळखा.

(1) कवि (2) दूध (3) काम (4) झाड

**43.** पुढील शब्दांपैकी कोणता शब्द तद्‌भव आहे ते निवडा.

(1) भाऊ (2) ग्रंथ (3) झोप (4) धोंडा

**44.** 'फणस' हा शब्द पुढीलपैकी कोणत्या भाषेतून मराठीत आलेला आहे ?

(1) पोर्तुगीज (2) फ्रेंच (3) फार्सी (4) कन्नड

**45.** धातूंना विविध प्रत्यय लागून क्रिया अपुरी दाखविणाऱ्या शब्दास काय म्हणतात ?

(1) उभयान्वयी (2) कृदन्ते (3) विशेषण (4) सर्वनाम

**46.** 'एखाद्या वाईट वृत्तीच्या माणसाला कितीही समजावून सांगितले तरी त्याच्यावर काहीही परिणाम होत नाही'–या दृष्टान्तासाठी पुढीलपैकी कोणती म्हण लागू पडणार नाही ?

(1) सापाला दूध पाजले तरी तो विषच ओकणार
(2) कुत्र्याची शेपूट नळीत घातली तरी शेवटी वाकडी ती वाकडीच
(3) गाढवापुढे वाचली गीता, रात्रीचा गोंधळ बरा होता
(4) गवत्या बसला जेवाया आणि ताकासंगे शेवाया

**47.** पुढीलपैकी कालवाचक क्रियाविशेषणाचा प्रकार कोणता ?

(1) आवृत्तीदर्शक (2) गतिदर्शक
(3) निश्चयदर्शक (4) स्थितीदर्शक

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**48.** पुढे दिलेल्या दोन वाक्यांपासून तयार होणारे संयुक्त वाक्य ओळखा.

(a) उन्हाळा वाढत होता

(b) पाऊस पडत नव्हता

**पर्यायी उत्तरे :**

(1) उन्हाळा वाढल्यामुळे पाऊस पडत नव्हता

(2) पाऊस पडत नसल्यामुळे उन्हाळा वाढत होता

(3) उन्हाळा वाढत होता आणि पाऊस पडत नाही

(4) उन्हाळा वाढत होता आणि पाऊस पडत नव्हता

---

**49.** केवलप्रयोगी अव्यये ही

(1) दोन वाक्ये जोडण्याचे काम करतात

(2) आपल्या उत्कट भावना व्यक्त करतात

(3) केवलप्रयोगी अव्यये विकारी असतात

(4) शब्दाचा वाक्याशी असलेला संबंध दर्शवितात

---

**50.** पुढीलपैकी शुद्ध शब्द ओळखा.

(1) पालुपद (2) पारस्पारिक (3) पाश्चात्य (4) पाल्हाळिक

---

**51.** 'डोळा' या शब्दाचा शब्दसिद्धीनुसार प्रकार कोणता ?

(1) देशी शब्द (2) परभाषीय शब्द

(3) तत्सम शब्द (4) इंग्रजी शब्द

---

**52.** पुढीलपैकी अंशाभ्यस्त शब्द ओळखा.

(1) अभिनंदन (2) आमरण

(3) घरबीर (4) अपहरण

---

**53.** सौंदर्य, मनुष्यत्व, विश्रांती, श्रीमंती या नावातील नामाचा प्रकार कोणता ते ओळखा.

(1) भाववाचक नाम (2) सामान्यनाम

(3) विशेषनाम (4) यापैकी नाही

---

**54.** पुढील उदाहरणामधील शब्दयोगी अव्ययांचा प्रकार ओळखा.

पेक्षा, तर, तम, मध्ये, परीस

(1) हेतूवाचक (2) कालवाचक

(3) स्थलवाचक (4) तुलनावाचक

---



Teachingninja.in

**55.** मी गुरूजींच्या पाया पडलो, शिवाय गुरुदक्षिणा दिली. यातील अधोरेखीत उभयान्वयी अव्ययाचा प्रकार कोणता ?

(1) विकल्पबोधक (2) समुच्चयबोधक

(3) न्युनत्त्वबोधक (4) परिणामबोधक

**56.** पुढील विधाने वाचा.

(a) ए – कारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप या – कारान्त होते.

(b) आ – कारान्त स्त्रिलिंगी नामाचे सामान्यरूप ए – कारान्त होत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) चूक (2) फक्त (b) बरोबर

(3) फक्त (a) बरोबर (b) चूक (4) फक्त (a) व (b) बरोबर

**57.** पुढे दिलेल्या पर्यायातून फार्शी + फार्शी असा समानार्थक शब्दाचा समास साधलेला अंशाभ्यस्त शब्द कोणता ?

(1) डावपेच (2) कागदपत्र

(3) रीतरिवाज (4) बाजारहाट

**58.** दोन नद्यामधील प्रदेशाला काय म्हणतात ?

(1) द्विज (2) दोआब

(3) द्विपकल्प (4) तिठा

**59.** पुढील विधाने वाचा.

(a) सतीश परीक्षेत उत्तीर्ण झाला – आज्ञार्थी

(b) सतीश परीक्षेत उत्तीर्ण झाला का ? – प्रश्नार्थी

(c) सतीश परीक्षेत उत्तीर्ण हो – विधानार्थी

(d) सतीशने परीक्षेत उत्तीर्ण व्हावे – विध्यर्थी

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (c) व (d) बरोबर

(3) फक्त (b) व (d) बरोबर (4) (a), (b), (c), (d) सर्व बरोबर

**60.** शरदाच्या चांदण्यात गुलमोहर मोहक दिसतो. या वाक्यातील विधानपूरक शब्द कोणता ?

(1) गुलमोहर (2) मोहक

(3) शरदाच्या चांदण्यात (4) दिसतो

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

61. The trade union's seemingly rightful demand is only a stalking horse to blackmail the management.

Identify the correct meaning of the underlined idiom.

(1) trick
(2) proposal
(3) pretence
(4) suggestion

62. Choose the best meaning of the underlined expression in the following sentence.

They made a great effort to reach some kind of modus vivendi.

(1) Arrangement of a method of doing something
(2) Arrangement of sharing profit equally
(3) Arrangement to live or work without quarrelling
(4) Arrangement of starting a new business

63. The days we spend in our school are the halcyon days of our life.

Select the correct meaning of the underlined.

(1) Strange days
(2) Wonderful days
(3) Peaceful days
(4) Valuable days

64. The manager was brought to book for his neglect of duty.

Choose the correct meaning of the underlined.

(1) brought on record
(2) punished
(3) kept at a distance
(4) scolded

65. Choose the correct option to fill in the blank.

I am all fingers and __________ today.

(1) nails
(2) thumbs
(3) hands
(4) foot

66. In which of the following sentences does the subject agree correctly with the verb ?

(1) The cat, unlike dogs, has soft paws.
(2) The cat, unlike dogs, have soft paws.
(3) The cat, unlike dogs, is having soft paws.
(4) The cat, unlike dogs, had soft paws.

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

67. Which of the given words are correctly spelt ?

(a) HILERIOUS
(b) HIPOCRISY
(c) HYPOTHETICAL
(d) INDISCERNIBLE

**Answer Options :**

(1) (b) and (c) only
(2) (c) and (d) only
(3) (a), (b) and (c) only
(4) (b), (c) and (d) only

68. 'A company secretary must be conversant with labour law'.

Which one of the following does the modal 'must' in the sentence above express ?

(1) obligation (2) advice (3) suggestion (4) necessity

69. Match the following :

(a) Carry the can — (I) To help
(b) Carry through — (II) To win
(c) Carry the day — (III) To be in love with
(d) Carry a torch for — (IV) To take the blame

**Answer Options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | I | IV | III | II |
| (2) | I | IV | II | III |
| (3) | IV | I | II | III |
| (4) | IV | I | III | II |

70. Choose the best opposite meaning of the word printed in capitals in the following sentence.

Today will be mostly fine and sunny, with INTERMITTENT showers.

(1) Incredible
(2) Termittent
(3) Incessant
(4) Heavy

71. Choose the correct articles to fill in the blanks.

(a) _________ apples are grown in many different countries.
(b) _________ apples on our tree are not yet ripe.

**Answer options** :

(1) The, no article
(2) The, the
(3) No article, the
(4) An, the

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

72. Which of the following are correct sentences ?
(a) He wants to leave his job.
(b) He wants to give up his job.
(c) He wants to give his job.
(d) He wants to leave up his job.

**Answer options :**
(1) only (a) and (b) are correct
(2) only (c) and (d) are correct
(3) only (b) and (c) are correct
(4) only (a) and (d) are correct

73. Select the correct options, underlined.
(a) Indian are very good to/of/at cricket.
(b) It is very good to/of/at you to help me.
(c) He is very good to/of/at others though he is very rich.

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) |
|---|---|---|---|
| (1) | to | at | of |
| (2) | of | to | at |
| (3) | at | of | to |
| (4) | of | at | to |

74. Select the incorrect sentence/s.
(a) They aren't satisfied, are they ?
(b) I am extremely happy, Isn't I ?
(c) Call the doctor, won't you ?
(d) Let's start, shall we ?

**Answer options :**
(1) only (a) and (b)
(2) only (b) and (c)
(3) only (c) and (d)
(4) only (a) and (d)

75. Choose the sentences containing correctly used pronouns.
(a) That book is her.
(b) That idea of yours is excellent.
(c) This book is mine.

**Answer options :**
(1) (a) only
(2) (c) only
(3) (a) and (b) only
(4) (b) and (c) only

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**Read the following passage carefully and answer the questions 76 to 80.**

As everyone knows, bombs have increased in power from the 20 ton chemical bombs of the early 1940's to the 20 thousand ton atomic bombs of 1945 and to the 20 million ton hydrogen bombs after 1953. Today there are enough hydrogen bombs of the greatest destructive power (100 million tons) to wipe out all life on our planet. Will we make even larger bombs in the future ? We can if we want to, but even for the most overwhelming military purposes we do not need to.

We have already reached some sort of limit. How much more dangerous can the situation get ? At the present time, we are very near the edge of death. Every year or two, in some major International Crisis – Korea, Suez, Berlin, Cuba, Vietnam, Kashmir – there is a serious probability of an 'accident' that could lead to a nuclear war. Dedicated men have worked hard and long in each of these situations to avoid a nuclear incident, but we may not continue to be so lucky. Next time it may be a nuclear terrorist or a madman or a mistaken junior officer or just faulty equipment. It is foolish of us to boast of the decrease in our death rate and the increase in the length of individual human lives in the $20^{th}$ century, or long as this nuclear danger is so uncontrolled. This is the first time in the history of the human race that – babies – all babies everywhere – have had such a small chance of living to an old age. We are indeed very near the limit in this danger. This situation can not continue. We cannot live very long walking on loose at the edge of a cliff. Either in 10, 20, or 30 years we fall over the nuclear cliff ; or else very soon, before that time runs out, we arrive at an international understanding and move back from the danger.

Some people talk of yet another possibility : We might have a nuclear war with a few people surviving by going underground into shelters and mines. But this, even if it could work, would only temporarily postpone the horrible problem. Do the survivors come out of the shelters and mines at last to bury, to clean up and to rebuild only to have their survivors go underground again after a revival of nuclear powers in another 20 years or so ? And then again 20 years after that ?



Teachingninja.in

**76.** The writer warns us against making larger bombs because

(1) we are already threatened with complete destruction.

(2) it is highly immoral.

(3) it will be a terrible waste of money and effort.

(4) we make other nations angree with us.

**77.** The passage says that as long as the nuclear danger is uncontrolled

(1) a junior officer will rescue us.

(2) we will have to depend on big nations for survival.

(3) we are at the mercy of such things as faulty machines and mad men.

(4) more babies will not be born in this world.

**78.** The passage says that the nuclear danger

(1) will become a reality in 20 years and every 20 years thereafter.

(2) can be avoided through an international understanding.

(3) will be like climbing a cliff.

(4) will not exist after 10 to 30 years because we will not exist.

**79.** The passage says that in case of a nuclear war

(1) shelters and mines will provide sufficient protection.

(2) more and more shelters and mines will have to be dug in which to bury the dead.

(3) many people will be able to live in shelters and mines.

(4) a few people may survive by going underground into shelters and mines.

**80.** Select the suitable title for the passage.

(1) Hydrogen Bombs

(2) International Crisis

(3) Accident

(4) Control of nuclear danger

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK



Teachingninja.in

**81.** Select the sentence/s punctuated correctly.

(a) Sounds, sights, light – all stopped.
(b) John Ray says ; Blood is thicker than water.
(c) John Ray says : Blood is thicker than water.
(d) Sounds, sights, light, all stopped.

**Answer Options :**

(1) Only (a) and (c)
(2) Only (b) and (d)
(3) Only (c)
(4) None of the above

**82.** Identify correct spellings.

(a) COLLOBORATE
(b) ASSASSIN
(c) CAMA FLAGE

**Answer Options :**

(1) (b) only
(2) (b) and (c) only
(3) (a) and (c) only
(4) (a), (b) and (c)

**83.** Choose the correct sentence.

(a) My older brother is a doctor.
(b) Pankaj is elder than his friend.
(c) He is the oldest member of the club.
(d) This is the older pair of shoes I have.

**Answer Options :**

(1) only (a), (b) and (c) are correct
(2) only (b), (c) and (d) are correct
(3) only (a) is correct
(4) only (c) is correct

**84.** Choose the correct option to fill in the blank.

We're on our beam- __________

(1) Tops
(2) Sides
(3) Ends
(4) Centre

**85.** We should give a wide berth to bad characters.

Select the correct meaning of the underlined.

(1) keep away from
(2) publically condemn
(3) give wide publicity
(4) not sympathise with

कच्च्या कामासाठी जागा/**SPACE FOR ROUGH WORK**



Teachingninja.in

**86.** Identify the correct mood of the given sentence.

Run to the shop.

(1) Indicative mood (2) Imperative mood
(3) Interrogative mood (4) Subjunctive mood

**87.** Choose the word opposite in meaning to OSTENTATIOUS.

(1) Unpretentious (2) Conscientious
(3) Advantageous (4) None of the above

**88.** Choose the word closest in meaning to the word in capital.

He bought his angry wife some flowers, but she refused to be MOLLIFIED.

(1) Crucify (2) Dignify
(3) Pacify (4) Deify

**89.** Choose the word having meaning opposite to the word in Capital.

All other considerations are SUBSERVIENT to the need for quick profit.

(1) Solvent (2) Predicament
(3) Resonance (4) Dominant

**90.** Select the sentence/s that are/is grammatically correct.

(1) He gave me two dozens oranges
(2) He gave me two dozen oranges
(3) He gave me two dozen orange
(4) He gave me two dozens orange

**91.** <u>Do your duty well</u>.

Select the correct passive voice of the above sentence.

(a) You are advised to do your duties well.
(b) Duties should be done well.
(c) You should do your duties well.

**Answer options :**

(1) only (a) (2) only (b)
(3) only (c) (4) only (a) and (b)



Teachingninja.in

92. Choose the correct sentences.

(a) Hoping for good news, we telephoned the hospital.

(b) Distracted by the noise, our driver was taken the wrong road.

(c) The mechanics started to repairing the engine.

**Answer options** :

(1) (a) only
(2) (c) only
(3) (b) and (c) only
(4) (a), (b) and (c)

93. Choose the correct passive form.

Active : She has not made me a cup of tea.

Passive : (a) A cup of tea was not made for me.

(b) A cup of tea has been not made for me.

(c) A cup of tea has being not made for me.

(d) I was not made a cup of tea.

(1) Both (b) and (d) are correct
(2) Both (a) and (b) are correct
(3) Both (a) and (d) are correct
(4) Both (b) and (c) are correct

94. Select proper modal verb.

John : My house is very near the motorway.

Jack : It ________ very noise.

(1) can be
(2) may be
(3) must be
(4) could be

95. Choose the correct verb form.

They went out after lunch and they.

____(I)____ just ____(II)____ back.

| | (I) | (II) |
|---|---|---|
| (1) | have | come |
| (2) | had | come |
| (3) | ____ | came |
| (4) | had | came |



Teachingninja.in

96. Identify the sentence/s grammatically correct.
(a) The committee is divided on some issues.
(b) The committee are divided on some issues.
(c) The committee has issued its report.
(d) The committee have issued their report.

**Answer Options** :
(1) Only (a) and (c)
(2) Only (b) and (c)
(3) Only (a) and (d)
(4) Only (b) and (d)

97. Select the grammatically correct sentence/s.
(a) Each of the employees, were given bonus.
(b) Each of the employees, was given bonus.
(c) Neither of the accusations is true.
(d) Neither of the accusations are true.

**Answer Options** :
(1) Only (a) and (c)
(2) Only (b) and (c)
(3) Only (b) and (d)
(4) Only (a) and (d)

98. Identify the correct sentence.
(a) John looks good before he leaps.
(b) John looks well before he leaps.

**Answer Options** :
(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

99. Choose the sentence that is equivalent to the following sentence.
The news is too good to be true.
(1) The news is very good because it cannot be true.
(2) The news is so good that it may not be true.
(3) The news is so good that it cannot be true.
(4) None of the above

100. Identify the incorrect sentence/s.
(a) A bridge was built across the river.
(b) The boy was below twelve.
(c) There is a fan above her head.

**Answer Options** :
(1) Only (a) and (b)
(2) Only (b) and (c)
(3) Only (c)
(4) Only (a)



Teachingninja.in

## सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत: बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग – 1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

### नमुना प्रश्न

प्रश्न क्र. **201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र.क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

SEAL



Teachingninja.in